# शेतकरी संघटक

पाक्षिक

आंदोलन विशेषांक - २

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

वर्ष ९ वे | ६ डिसेंबर १९९२ | अंक १७ वा


# धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र – न्हावा शेवा

## – शरद जोशी

९ डिसेंबर १९९२ या दिवशी आपण सगळे शेतकरी मुंबईच्या बंदरावर पोहोचणार आहोत. १२ डिसेंबर १९९२, विलायती कापडाला अडवताना हुतात्मा झालेल्या बाबू गेनू यांचा स्मृतिदिन. तो साजरा करेपर्यंत मुंबईत बंदरावर आपण थांबणार हे निश्चित. त्यानंतर पुढचे कार्यक्रम ठरवतील, तेथे जमलेले लाख लाख शेतकरी भाऊ आणि मायबहिणी.

**तपभराची तपस्या**

गेल्या १२ वर्षात आपण एक तप केले. अनेक आंदोलने केली. शेतकऱ्यांना त्याच्या शेतीमध्ये माणूस म्हणून जगता आले पाहिजे हा आग्रह धरला. धरतीमातेची सेवा करून पीक फुलवणाऱ्या शेतकऱ्याला कोणत्याही भीकेची गरज का असावी? जमिनीमध्ये अन्नधान्याचा गुणाकार करणाऱ्या अन्नदात्याला भीक घालायला पुढे कोण येते? जे काहीच उत्पादन करीत नाहीत असे नोकरदार? आणि त्यांचे मालक सरकार? निदान दोन हजार वर्षाच्या इतिहासाने दिलेली शिकवण आहे, कोणतेही सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे असत नाही ही. आम्हाला तुमच्या सूटसबसिडीचे आणि कल्याणप्रकल्पांचे नाटक नको. आमच्याकरिता काही करायचे असेल तर एवढेच करा, मेहेरबानी करून तुमचे गचाळ आणि अजागळ हात आमच्या शेतीत खूपसू नका. आमच्या घामाचे दाम आम्ही मिळवू शकतो; त्यात अडथळे आणायचे शासकीय धंदे बंद करा. एवढी शेतकरी आंदोलनाची साधी सोपी भूमिका होती. दिसायला साधी पण तिच्या गर्भात महाप्रचंड परिवर्तन घडवून आणणाऱ्या एका क्रांतीची बीजे होती. जे बी शेतकरी आंदोलनाने रुजवले.

त्याकरिता खूप मशागत केली. पुढाऱ्यांचे, जातीयवाद्यांचे तण काढून टाकण्याचा प्रयत्न केला. जातीयवाद्यांची कीड पिकावर हल्ले करण्यास आली त्यांचा प्रतिकार केला. स्त्रीशक्तीची जोपासना करून पिकाला खतपाणी घातले. घामाच्या दामासाठी आपला व्यवसाय स्वायत्तपणे करता यावा यासाठी अनेक आंदोलने केली.

कष्ट सोसले, लाठ्या खाल्ल्या, तुरुंगवास सोसले. महाराष्ट्रात सत्तावीस शेतकऱ्यांनी या कामात आपल्या प्राणांची आहुती दिली.

कांदा, ऊस, तंबाखू, दूध, ज्वारी, कापूस या वेगवेगळ्या पिकांवर सरकारी

## न्हावा-शेवाऐवजी गेटवे ऑफ इंडिया

*महाराष्ट्र दौऱ्यात असतानाच हा लेख लिहून या कार्यालयाकडे रवाना केल्यानंतर श्री. शरद जोशी यांना ठाणे विभाग पोलिस आयुक्तांनी त्यांच्या विभागामध्ये प्रवेश करण्यास बंदी करणारा आदेश जारी केल्याची बातमी हाती आली. न्हावा-शेवा बंदर व त्याचा परिसर या पोलिस आयुक्तांच्या अधिकारक्षेत्रात येत असल्याने शेतकरी संघटनेचा नियोजित बंदर रोको कार्यक्रमात काही विघ्न आणण्याचा शासनाचा विचार असावा असे या आदेशावरून वाटते. कार्यक्रम शांततेत पार पाडावा म्हणून ह्या आदेशाचा भंग करण्याचा विचार मनात न आणता शेतकरी संघटनेने हा कार्यक्रम न्हावा-शेवा ऐवजी मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथे घेण्याचे ठरविले. कार्यक्रम ठरल्याप्रमाणे ९ डिसेंबर १९९२ रोजी दुपारी १ वाजता सुरू होणार असून हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन दिनांक १२ डिसेंबर १९९२ रोजी लढ्याच्या पुढील कार्यक्रमाची घोषणा करण्यात येईल. लेखात जरी न्हावा-शेवा बंदर असा लढाईच्या ठिकाणाचा उल्लेख असला तरी हा कार्यक्रम गेटवे ऑफ इंडिया येथे होईल.*

हल्ला होत होता. तेथे तेथे रास्त भावासाठी आंदोलन केले. वेगवेगळे प्रदेश, निरनिराळे शेतकरी, अलग अलग पीके, पण सगळ्या आंदोलनाचा हेतू एक. आमच्या श्रमाचे फळ आम्हाला मिळू द्या. त्यात हात खुपसू नका. सगळ्या शेतकऱ्यांच्या शेतात येणारे एक तण म्हणजे 'कर्ज'. कर्जमुक्तीचाही लढा शेतकरी आंदोलनाने हाती घेतला.

**नेहरूव्यवस्थेचा फजितवडा**

बारा वर्षाच्या या उग्र तपस्येनंतर पीक फुलोरू लागले. शेतकरीविरोधी व्यवस्था ढासळू लागली. अर्थव्यवस्थेची दिशा आणि चलनवलन सामान्यजन ठरवू शकत नाही. त्यासाठी कोणी मध्यवर्ती 'दुढ्ढाचार्य' नियोजनाला बसले पाहिजेत असे मानणाऱ्यांचा फजितवाडा झाला. शेतकरी, व्यापारी, उद्योजक, केवळ फायद्याकडे बघतात; देशाच्या व्यापक हिताची कामे ते करू शकणार नाहीत; त्यासाठी सरकारी क्षेत्राच्या हाती 'निर्णायक सत्ता' पााहिजे असे आग्रहाने सांगणारे संपले. विकास म्हणजेच कारखानदारी आणि कारखानदारी म्हणजेच विकास असा आक्रोश करणारे परकीय कर्जाच्या विळख्यातून सुटण्यासाठी निर्यात करणे हे कारखानदारांना शक्य नाही हे मान्य करून शेतकऱ्यांकडे त्यासाठी आशेने पाहू लागले. जगभरच सर्वंकष नियोजनवाद्यांचा जागतिक पराभव झाला. समाजवादी साम्राज्याचा पाडाव झाला. दोन महासत्तांमध्ये लपाछपी खेळण्याचा तथाकथित शांतीदूतांच्या तटस्थतावादाचा निकाल लागला. थोडक्यात, आपल्या देशापुरते बोलायचे झाले तर लायसेंस-परमिटराज्य, नोकरशाही, बेकारी, महागाई, केंद्रीकरण, आणणाऱ्या नेहरूवादाचा अस्त झाला.

**बळीराज्याची द्वाही**

नव्या पंतप्रधानांनी जुन्या व्यवस्थेच्या अपयशाची कबुली दिली. आता देशाला नवीन मार्गाने जावे लागेल असे म्हटले. खुल्या बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेकडे देशाला नेण्याचे जाहिर केले. जे 'बळीराज्य' येणार येणार म्हणून हजारो वर्षे शेतकरी मायबहिणी 'इडा पिडा टळो' म्हणत प्रार्थना करीत होत्या त्या बळीराज्याची द्वाही लाल किल्ल्यावरून खुद्द पंतप्रधानांच्या मुखातून झाली.

एवढ्या मोठ्या क्रांतीकारी परिवर्तनाची घोषणा झाली आणि वगवेगळे प्रतिसाद निनादू लागले.

१० नोव्हेंबर ९१ च्या शेगांव मेळाव्यात देशभरच्या शेतकऱ्यांनी या बळीराज्याचे स्वागत केले. जुने झाले गेले गंगेला मिळाले. नेहरूव्यवस्थेतल्या अन्यायाबद्दलची चीड, दुःख, संताप विसरून जाऊन देशाला संकटातून सोडवून नव्या वैभवाच्या मार्गाकडे नेण्यासाठी तयारी सुरू केली. सीता शेती, माजघर शेती, व्यापार शेती, निर्यात शेती अशा चतुरंग शेतीचा कार्यक्रम जाहिर केला. शेतकऱ्यांच्या लुटीच्या तीन हजार वर्षाच्या इतिहासात शेतकरी शेतात कोंडला गेला होता. रयत बनला होता. जमिनीच्या मालकीवर कागदोपत्री हक्क असणारा वेठबिगार बनला होता. बळीराज्याची द्वाही फिरताच हे सगळे तुरुंग मोडून स्वतंत्र व्यावसायिकाची, उद्योजकाची निसर्गदत्त भूमिका बजावण्यासाठी तो सज्ज झाला.

नेहरूव्यवस्थेतील ४५ वर्षांचे सतत अन्याय आणि अत्याचार सोसूनही देशातील आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ताकदीने उभे राहण्याची हिंमत शेतकऱ्यांनी बांधली. या कार्यक्रमात शेतकऱ्यांची सरकारकडून अपेक्षा अगदी सोपी आणि साधी होती. अर्थक्षेत्रातील शासनाची नालायकी सिद्ध झाली आहे. शासनाने देश बुडवला आहे. ज्यांनी देशाचा गळा दाबला तेच आता पुढे सरसावून देशाला वाचवण्याचा कांगावा करीत आहेत, हे शक्य नाही. शेतकऱ्यांचा इशारा एकच, देशाच्या मारेकऱ्यांनो बाजू हटा. अनुत्पादक बांडगुळांनो दूर व्हा, देश वाचवण्याचे काम करण्यास उत्पादक सज्ज झाले आहेत. त्यांच्या वाटेत कडमडला तर याद राखा.

**पंतप्रधानांचे डगमगते पाय**

खुल्या अर्थव्यवस्थेकडे चाल करण्याची पंतप्रधानांची इच्छा कितपत खरीखुरी आणि कळकळीची हे इतिहास ठरवेल. पण त्यांची पावले फार लवकर डगमगू लागली. नेहरूव्यवस्थेत पोसलेल्या आणि जोम धरलेल्या बांडगुळांनी, अमरवेलींनी त्यांच्या चैनीला आणि लयलुटीला तयार झालेला धोका ओळखला आणि हलकल्लोळ सुरू केला. देशात आज एक नवा संघर्ष सुरू झाला आहे. या संघर्षाचे स्वरूप कोणा वर्तमानपत्रात सांगितले नाही, कोणा पुस्तकात लिहिलेले नाही, पण इतिहासात स्पष्ट लिहिले जाणार आहे.

या लढाईत दोन सैन्ये समोरासमोर ठाकली आहेत. एका बाजूला कष्ट करून, कौशल्याने, तंत्रज्ञानाने, कसोशीने, उत्पादन करून अभिमानाने जगू इच्छिणारे. दुसऱ्या बाजूला जमवाजमव चालली आहे लायसेंस परमिटच्या आधाराने माजलेले मक्तेदार, नेहरूकाळांत लयलूट करून घेतलेले नोकरदार, राजकीय दलालीने पुष्ट झालेले पुढारी आणि इतर सगळे फुकटखाऊ यांची.

**पहिली तोफ**

या लढाईची पहिली तोफ डागली होती २५ नोव्हेंबर १९९२ रोजी नव्या दिल्लीच्या बोटक्लबवर. देशभरच्या संघटीत कामगारांचे जथ्थेच्या जथ्थे दिल्लीला पोचले. खुल्या अर्थव्यवस्थेला, शेतकऱ्यांच्या बळीराज्याला हाणून पाडण्याच्या घोषणा त्यांनी केल्या. त्यांची मागणी – देशाचे काहीही होवो; देश जगो बुडो; कारखाना, सरकारी क्षेत्रातील

उद्योगधंदे जगोत बुडोत आम्ही काम करू ना करू, आमचे पगार, भत्ते, नोकरीची शाश्वती यांना धक्का लागता कामा नये. नेहरूव्यवस्थेतील हे संस्थानिक नव्या व्यवस्थेला अपशकून करण्याकरिता सज्ज झाले आहेत.

**अयोध्येचा हिशेब**

याच लढाईची दुसरी तोफ डागण्याची खटपट चालू आहे. अयोध्येत ६ डिसेंबर १९९२ रोजी राम मंदिराच्या नावाखाली दंगेधोपे माजले म्हणजे उत्पादकांत दुफळी माजेल आणि शासन अधिक मजबूत बनेल हा त्यांचा एक डाव. त्यांचा दुसरा हेतू देशासमोरील आणि लोकांसमोरील विषयपत्रिकाच बदलून टाकणे हा आहे. जुन्या व्यवस्थेने आर्थिक आरिष्ट ओढवले म्हणून जुनी व्यवस्था जाणार असेल तर काही काळ का होईना लोकांचे लक्ष दुसरीकडे वेधले गेले पाहिजे. अशा हिशेबाने वावदूक विषयांवर ही मंडळी आग लावू पहात आहेत.

नेहरूकाळापासून लायसेंस-परमिट राज्याच्या जंगलात सावजांवर भक्ष घालण्यास सोकावलेले राजकीय दलाल राज्यकर्त्या पक्षांतसुद्धा बळीराजाला विरोध करण्यासाठी चंग बांधून बसले आहेत.

लायसेंस-परमिट राज्यात भरपेट कमावलेले मक्तेदारी कारखानदारसुद्धा खुल्या बाजारव्यवस्थेच्या द्वाहीने भयभीत झाले आहेत. आणि 'स्वदेशी'चा संधिसाधू पुकारा करून बळीराज्याची वाट अडवू पहात आहेत.

**बळीराज्याचे सैन्य**

आपण शेतकरी मुंबईला जात आहोत ते या सगळ्या हल्लेखोरांविरुद्ध. बळीराज्याचे संरक्षण करण्याकरिता. आजपर्यंत आपण गुलामीतून सुटण्यासाठी आंदोलने केली. आता करणार आहोत बळीराज्याच्या संरक्षणासाठी, घनघोर लढाई.

मुंबईला जाणारा शेतकरी हा जुना शेतकरी नाही. स्वतःच्या कष्टाने, बुद्धीने, टाकटुकीने, कार्यक्षमतेने 'नेटका प्रपंच' करून सन्मानाने जगू पाहणारा उद्योजक आहे, व्यावसायिक आहे. स्वतंत्र अर्थव्यवस्थेच्या संरक्षणाच्या लढ्यात पुढे राहून झुंजण्याची त्याने तयारी केली आहे. शेतकऱ्यांचा लढा आता आर्थिक स्वातंत्र्याचा लढा झाला आहे. त्यात तो अग्रभागी राहणार आहे.

**उद्योजकांनो एक व्हा**

पण आर्थिक स्वातंत्र्याची लढाई एकट्या शेतकऱ्याची नाही. त्यात तो एकाकी पडणार नाही.

देशात भरपूर गहू असतांना दुप्पट किंमतीने परकीय चलन खर्चून देशातील उत्पादन बुडवण्याचा धोका घेऊन खुल्या अर्थव्यवस्थेची भाषा बोलणारे सरकार गव्हाची प्रचंड आयात करीत आहे. हा स्वतंत्र अर्थव्यवस्थेवरील मोठा हल्ला आहे. महाराष्ट्रीय शेतकरी गहू पिकवत नाही. तरी तो या लढाईला निघाला आहे. ज्यांची शेतीही नाही पण स्वतंत्रपणे, प्रामाणिकपणे, कष्टाळूपणे आपापला व्यापार, हुन्नर, व्यवसाय, उद्योग, व्यासंग, कला, साहित्य यांची जोपासना करू इच्छितात नेहरूवादी नोकरशाहीच्या अजगरमिठीतून सुटू इच्छितात ते सगळे या भरतभूमीचे खरे सुपुत्र नेहरूवादाला तिलांजली देण्याकरिता आणि बळीराज्याचा शुभारंभ करण्याकरिता या लढाईत सामील होणार आहेत. एका बाजूस उत्पादक आणि दुसऱ्या बाजूस ऐतखाऊ अशा या लढाईची आघाडी. बळीराजातर्फे न्हावाशेवा बंदराच्या परिसरात ९ डिसेंबर १९९२ रोजी उघडली जाणार आहे.

**गांधीजींचा वारसा**

या लढाईची पहिली घोषणा महात्मा गांधींनी ४५ वर्षापूर्वी केली. देशाचा विकास म्हणजे गावाची समृद्धी हे गांधीजींचे दर्शन. याउलट, कारखानदारी म्हणजे देशाचा विकास ही आंग्लविद्येने विटाळलेल्या जवाहरलाल नेहरूंची धारणा. स्वतंत्र भारताचे सरकार औद्योगिकरणाची कास धारणार असेल तर त्याविरुद्ध लढण्यासाठी मला उभे रहावे लागेल असे महात्माजींनी स्पष्ट केले होते. महात्माजी गेले. महात्माजींच्या मनातली नेहरूविरोधी लढाई सुरू झालीच नाही.

या लढाईसाठी जमवाजमव सुरू केली होती चक्रवर्ती राजगोपालाचारींनी. पण तो प्रयत्नही असफल झाला, कारण बळीराज्याच्या अवताराची वेळ आली नव्हती. नेहरू विचाराचे भयानक जहरी परिणाम त्यावेळी स्पष्ट झाले नव्हते. उद्योजकांच्या वतीने बोलण्यास काही इनेगिने कारखानदार फक्त तयार होते. शेतकरी सरकारकडून 'खैरात' मिळेल या आशेने लाचार होऊन बसला होता. उद्योजक म्हणून त्याला आपली स्वतःची ओळख पटलेली नव्हती.

न्हावाशेवा येथील मेळावा हे एक ऐतिहासिक पाऊल आहे. बांडगुळांचा बादशहा जवाहरलाल नेहरू यांचे नाव काढून टाकून, शेतकरी जुनी व्यवस्था संपल्याची आणि नवी व्यवस्था येत असल्याची तुतारी फुंकणार आहे. या वेळी उद्योजक इनेगिने तुटपुंजे नाहीत. देशातील ७०% शेतकरी आर्थिक स्वातंत्र्याचा झेंडा हाती घेऊन पुढे सरसावला आहे. विरोधात उरले आहेत ४५ वर्षात पोसलेले दलाल, मक्तेदार आणि नोकरदार. बळीराज्याचे आगमन आता कोणी रोकू शकत नाही याची द्वाही शेतकरी "बंदर न्हेरू आणि गद्दार गेहू रोकून" देणार आहेत.

● ● ●

## जपान भातउत्पादकांना वाऱ्यावर सोडू इच्छित नाही

अमेरिका आणि यूरोपीयन राष्ट्रसमूहाकडून मोठ्या प्रमाणावर दडपण येत असतांनाही जपानमधील लिबरेशन डेमोक्रॅटिक पक्षाचे शासन तांदळावरील आयातबंदी उठवायला तयार नाही.

जपानचे पंतप्रधान क्लिची मियाजावा यांनी जपानी पत्रकारांना सांगितले की, "जपान दीर्घकाळापासून चालत आलेल्या तांदुळाच्या आयातबंदीच्या धोरणाबाबत कोणतीही तडजोड करणार नाही. राष्ट्राच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असणे अत्यंत आवश्यक आहे."

बरीच वर्षे चालू असलेल्या उरुग्वे वाटाघाटींची तड लागावी यासाठी अमेरिकेकडून जपानवर जपानने आपल्या तांदूळ आयातबंदीत काहीशी ढील द्यावी यासाठी सतत दडपण येत आहे. जपान सरकारमधील एक गटही आयातबंदीत अशी ढील देण्याच्या बाजूने आहे. पण, तांदुळावरील आयातबंदी अल्पांशाने जरी उठवली तरी जपानच्या शेतीक्षेत्रावर त्याचे विपरीत परिणाम होतील आणि देशाचे अन्नधान्य उत्पादन कमी होऊ लागले. म्हणून बाहेरून स्वस्तात तांदूळ मिळत असला तरी तो आयात करून देशातील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडायला जपान सरकार तयार नाही.

(इकॉनामिक टाईम्स् २३-११-९२ वरून)

## कांदा : उत्पादन व निर्यात

| वर्ष | उत्पादन (लाख टन) | निर्यात (लाख टन) |
|---|---|---|
| १९८८-८९ | ३३.५ | २.३५ |
| १९८९-९० | ३०.७ | ३.६० |
| १९९०-९१ | ३१.५ | २.८९ |
| १९९१-९२ | * * | ४.१६ |
| १९९२-९३ | * * | २.२५ * |

** माहिती उपलब्ध नाही.

* एप्रिल ९२ ते ऑक्टोबर ९२ या काळातील एकूण निर्यात.

## लढाईच्या काही घोषणा

★ शेतकरी संघटनेचा विजय असो

★ शेतकरी महिला आघाडीचा विजय असो

★ भीक नको, घेऊ घमाचे दाम

★ शेतकरी तितुका एक एक

★ परदेशी गहू इंडियन खाती
आमच्या माणसांची होते माती

★ मुक्त अर्थव्यवस्थेला पर्याय नाही

★ घर की मुर्गी दाल बराबर

★ किसान सब एक हैं
देश के लिए नेक हैं।

★ चालू राही नेहरू नीती
किसान सारे पाताळात जाती

★ नेहरू नीती की हार हुई
नयी मुक्त व्यवस्था उभर आई।

★ शेतकऱ्याने नाही केला पेरा
तर जग काय खाईल, धत्तुरा?

★ किसान एकता झिंदाबाद।

★ *Government Hands off Economy*

★ सरकार समस्या क्या सुलझाएँ?
सरकार यही समस्या है।

★ पराभूत झाली नेहरूनीती
देशाला वाचवील कृषिनीती

# गव्हाची आयात : सर्जनशील दिवाणजींपासून सावध !

**— अजित नरदे, जयसिंगपूर**

देशात गव्हाचा मुबलक साठा असताना केवळ बाजारपेठेतील दर पाडण्यासाठी झालेली ३० लाख टन गव्हाची आयात दुर्दैवी तर आहेच, पण केवळ अल्पकालीन स्वार्थासाठी देशहिताचाही बळी दिला जातोय. तरीही केंद्र शासनाच्या या धोरणांचे समर्थन अनेकजण आजही उघडपणे तरीत आहेत. त्यांनी उपस्थित केलेल्या काही मुद्दयांचा येथे विचार केला आहे.

गोदी कामगारांचे नेते श्री. मनोहर कोतवाल यांनी गहू आयातीचे समर्थन केले आहे. आयातीचे समर्थन करीत असताना त्यांनी उपस्थित केलेला पहिला मुद्दा असा - ''डॉक लेबर बोर्डाला दर महिन्यास दीड कोटी रुपयाचा तोटा येतो. त्यामुळे गेले तीन महिने कामगारांना देण्यासाठी बोर्डाकडे पैसा नव्हता. पण आता गोदीत काम आहे, तेव्हा हरताळ पाळण्याचे आवाहन व्ही. पी. सिंग त्यांना करीत आहेत. अर्थात गोदी कामगारांचे नेते कोतवाल यांना हे मान्य नाही.

देशाचे कितीही नुकसान झाले तरी गव्हाच्या आयातीमुळे मनोहर कोतवालांच्या कामगारांना त्याचा 'लाभ' मिळत असेल तर त्यांनी आयातीला विरोध करण्याची अपेक्षा ठेवणे चूकच आहे. देशातील एकंदरीत कामगार वर्गाची सामाजिक बांधिलकी लक्षात घेता त्यांच्याकडून असे घडणे अशक्यच आहे. तथापि केवळ गोदी कामगारांना काम मिळते, जहाज कंपन्यांना काम मिळते, बंदरांतून धान्य उतरवतांना कांही लोकांची उखळे पांढरी होतात म्हणून गव्हाची आयात झालीच पाहिजे, असे कोणताही, सूज्ञ माणूस मान्य करणार नाही. म्हणूनच यांसबंधी अधिक लिहीत नाही.

मनोहर कोतवाल यांचा दुसरा मुद्दा असा 'देशातील गव्हाला २८० वा २८५ तर परदेशी गव्हाला ४०० रूपये क्विंटल हा भाव का हा प्रश्न दिशाभूल करणारा आहे. वास्तविक ४०० रुपये ही परकी शेतकऱ्यांना मिळणारी किंमत नाही. वाहतूक इत्यादि खर्च धरून ही किंमत होते. ती तिकडील शेतकऱ्यांना मिळत नाही. केंद्र सरकार गव्हाला क्विंटलमागे २८० रुपये देते. भारतीय अन्न महामंडळाला हे धान्य वाहून नेण्यासाठी १३१ रुपये क्विंटलमागे खर्च येतो. म्हणजे ४११ रुपये होतात.'' म्हणून कोतवाल यांच्या मते देशी गव्हापेक्षा विदेशी गहू ११ रुपयांनी स्वस्त आहे. सबब आयात करणे योग्य आहे.

दुसऱ्या बाजूला शासकीय सूत्राकडूनही अशाच पद्धतीच्या बातम्या दिल्या जाताहेत. शासकीय सूत्राने दिलेली माहिती 'व्यापार' या हिंदी आर्थिक साप्ताहिकाने दिली आहे. (दि. १६.११.९२) ''आयात गव्हाची किंमत १३२.१६ अमेरिकन डॉलर, तर विमा खर्च ०.३० डॉलर आणि वाहतूक खर्च २८.८३ अमेरिकन डॉलर असे एकूण प्रतिमेट्रीक टन १६१.२९ अमेरिकन डॉलर गव्हाचा खर्च आला. भारतीय रुपयात ही किंमत ४१९४ रुपये प्रति मेट्रीक टन होते.'' म्हणून गव्हाची आयात प्रति क्विंटल ५५० ते ६०० रुपये दराने झाली हा विरोधकांचा आरोप अयोग्य आहे, असा शासकीय सूत्राचा दावा आहे.

आता वस्तुस्थिती काय आहे ते पाहू. अनेक खाजगी कंपन्या एखाद्या वर्षी नुकसान झाल्यास, फायदा कमी झाल्यास भागधारकांच्यात संभ्रम निर्माण होऊन शेअर्सचे दर कमी होऊ नये, म्हणून सर्जनशील हिशोब Creative Accounting पद्धतीचा वापर करून नफा वाढवून दाखवतात. या पद्धतीत अनेक खर्चाच्या बाजू, आहेत त्यापेक्षा कमी दाखवून नफा वाढवला जातो. पण असे करणे एखाद्या वर्षी ठीक असते. प्रत्येक वर्षी जर सर्जनीशील हिशोब पद्धतीचा वापर केला तरी एक ना एक दिवस कंपनी दिवाळखोरीच्या रस्त्याला येणारच. एखाद्या व्यापारी पेढीचा दिवाणजी सर्जनशील हिशोब पद्धत वापरून प्रत्येक वर्षी नफा झाल्याचे दाखवून स्वतःचा पगारही वाढवून घेईल. पण त्यामुळे होणारे नुकसान वेळीच ओळखून उपाय योजना न केल्याने ती व्यापारी पेढीच संपून जाण्यास वेळ लागत नाही. तसेच देशाचे खरे मालक जनता आहे. त्यांनी शासनाने दिलेले हिशोब खरोखरीचा आहे का हे तपासले पाहिजे. तरच देशही पुन्हा दिवाळखोरीच्या रस्त्याला लागणार नाही.

आता शासकीय हिशोबातील सर्जनशीलता पाहा. आयात केलेल्या अमेरिकन गव्हाचा एकूण खर्च १६१.२९ डॉलर विमा व वाहतुकीसह भारतीय बंदरापर्यंत झाला. सदर खर्च भारतीय रुपयात प्रति मेट्रीक टन ४१९४ रुपये इतका झाला असा शासकीय सूत्राचा दावा आहे. गव्हाची किंमत आपण डॉलरमध्ये दिली. डॉलरचे खुल्या बाजारातील विनिमयाचे दर ३० रुपयाच्या जवळपास आहे, पण प्रत्यक्षात रिझर्व्ह बँकेचा विनिमयाचा दर २५.७९ रुपये आहे. गव्हाच्या आयातीचा विचार करताना खुल्या बाजारातील डॉलरच्या किंमतीचाच विचार करणे आवश्यक आहे. रुपयाची किंमत अवाजवी वाढवून डॉलर स्वस्त केल्याने वस्तुस्थिती बदलत नाही. म्हणजे शासकीय सूत्राचे सर्व आकडे मान्य केले तरी आयात गव्हाची किंमत प्रति टन ४८४० रुपये इतकी होते. सदर खर्च फक्त गहू भारतीय बंदरात येण्यापुरताच आहे. पुढील खर्चात जहाजातून धान्य खाली उतरवणे, बंदरावरील गोडावून मध्ये नेणे, तेथे पोत्यात भरणे, तेथून ट्रकने वेगवेगळ्या भागात पाठवणे हा खर्च वेगळा आहे.

गोदी कामगार नेते मनोहर कोतवाल म्हणतात तसे विदेशी शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ४०० भाव मिळाला नाही, तर वाहतूक खर्च धरून ही किंमत आहे, हे चूक आहे.

अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया येथील शेतकऱ्यांना गव्हाची किंमत प्रतिक्विंटल ४२५ रुपये इतकी आपण दिली आहे. इतर खर्च वेगळा आहेच. भारतातील गहू शासनाने प्रति क्विंटल २८० रुपयाला घेतला तरी वाहतूक खर्च १३१ धरुन एकूण ४११ रुपयाला पडतो असा त्यांचा दावा आहे. देशातील ग्राहकांने रेशन दुकानातून पिशवीत भरतानापर्यंत झालेल्या खर्चाचा हिशोब भारतीय गव्हाच्या बाबतीत त्यांनी केला आहे. पण विदेशी गव्हाच्या बाबतीत मात्र विदेशातील खरेदी किंमतीपेक्षाही कमी खर्चात वाहतुकीसह पोचवण्याचा 'चमत्कार' त्यांनी केला आहे. यालाच सर्जनशीलता म्हणतात! अमेरिकेतून ४२५ ने गहू खरेदी करून ४०० रुपयात पोचवण्याच्या या चमत्काराकडे दुर्लक्ष करून आयात वाहतूक व्यवहार पाहू.

शासनाने गव्हाच्या आयातीचा व्यवहार पक्का केल्यानंतर शिपींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' या भारतीय कंपनीला त्वरीत गहू आयात करण्याचा आदेश दिला. शिपींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ही कंपनीही शासकीय क्षेत्रातीलच. त्यांना आदेश मान्य करणे भागच होते. कंपनीच्या बोटी मोकळ्याच असतील तेथून त्वरीत अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडाला पाठवल्या गेल्या. आता मद्रास येथे असलेली बोट २५ दिवस प्रवास करून रिकामीच अमेरिकेला गेली. तो खर्च कंपनीवर पडला. तेथून गहू घेऊन परत आली. रिकामी जहाजे पाठवण्याचा खर्च कंपनीने घेतला नाही. कारण कंपनी शासनाचीच. यामुळे कंपनीला तोटा झाला तर करदात्याकडून घेतलेल्या पैशातून शासन भरपाई करेलच. पण तो खर्च गव्हाच्या आयातीच्या खर्चात आता आलाच नाही.

शिपींग कॉर्पोरेशनच्या कस्तुरबा, राणी पद्मिनी, लोकप्रकाश, लोक राजेश्वरी इत्यादी १० बोटी सध्या गव्हाची आयात करीत आहे. तामीळनाडू येथील टुटुकोरीयन बंदरातील परिस्थिती पहा. तेथे आता नोव्हेंबर महिन्यातच लोकराजश्री आणि लोकप्रकाश या बोटी गहू घेऊन आल्या आहेत. बंदरात पाण्याची खोली फक्त २७ फूटच आहे म्हणून बोटी मध्य समुद्रातच नांगर टाकून उभ्या आहेत. तेथून क्रेनने छोट्या २०० टनी क्षमतेच्या बोटीत धान्य भरले जाते. भरताना समुद्रात बरेच धान्य सांडते. तेथून छोट्या बोटी बंदराकडे घेऊन येतात. येताना लहान मच्छीमारी नावा या बोटीजवळ येतात. बोटीतील गहू जमेल तितक्या नावेत ओढून घेतात व निघून जातात. शेवटी शिल्लक गहू यया बोटी घेऊन बंदरात जातात. तेथेहीसांडतच हा गहू ट्रकमध्ये भरला जातो. तेथून १० कि.मी. अंतरावरील गोदामात नेला जातो. जात असताना ट्रकमधून गहू इतका सांडत असतो की या १० कि.मी. अंतरावरील रस्त्यात किमान ५०० स्त्री, पुरुष आणि मुले रोज हा गहू गोळा करण्याचेच काम करीत आहे. बंदरावर वाळू पसरावी तसे गहू पडले आहे. गहू तुडवतच फिरावे लागते. त्यातच मध्यंतरी झालेल्या पावसात किती गव्हाची नासाडी झाली याची फूड कॉर्पोरेशनलाही कल्पना नसावी.

तेथे प्रत्येक जण अचानक मिळालेल्या संधीत आपले भले करण्याच्या नादातच आहे. छोट्या बोटीचे मालक वेगवेगळ्या कुरापती काढून, वारंवार संप करून, आपला दर वाढवून घेत आहेत. वेगवेगळ्या पातळीवर गव्हाची चोरी आणि नासाडी होण्यास प्रत्येक जण जमेल तेवढी मदत करीत आहेत. अशा वेळी त्यांनी गव्हाच्या आयातीला विरोध करावा, अशी अपेक्षा ठेवणे म्हणजे रामा शिवा गोविंदा!

शिपींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया ही सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे. तोटा झाला तर देशातील जनतेनेच त्याची भरपाई करायची आहे. आता टुटीकोरीयन बंदरात आलेल्या लोकराजश्री आणि लोकप्रकाश या बोटींना गहू भरण्यास अमेरिकेत फक्त १६ तास लागले. मात्र भारतात आल्यानंतर आज २५ दिवस झाले तरी सर्व गहू उतरवला गेला नाही. आणखी किती दिवस लागतील कोणास ठाऊक! या दोन्ही बोटी रोज दीड लाख रुपये मिळवण्याच्या क्षमतेच्या आहेत. यामुळे कंपनीला होणाऱ्या तोट्याचा हिशोब करा. दुसरी एक बोट पाँडेचरीजवळील कोडलूर बंदरात उभी आहे. १५ दिवसात फक्त ५००० टन गहू उतरवला गेला. अशा पद्धतीने गव्हाच्या आयातीत कोट्यावधी रुपयाचे कंपनीचे नुकसान झाले. कदाचित कंपनीला नुकसान भरपाई मिळेल, मिळणारही नाही. पण मालक आणि ग्राहक शासनच. त्याची किंमत तुम्ही आम्हीच द्यायची.

आता वाहतुकीचा खर्च किती येतो ते पाहू. मुंबई बंदरात गहू आणण्यास ७६० रुपये प्रति लाँग मे. टन शिपींग कंपनीला द्यावे लागले. तर अन्य टुटीकोरीयन सारख्या छोट्या बंदरात तोच खर्च ९२० रुपये प्रति लाँग मे. टन इतका येतो. एक लाँग मे. टन म्हणजे १०१६ किलोग्रॅम. म्हणजे जवळपास मे. टनच. मुंबई बंदरात मोठ्या बोटी येऊ शकत असल्याने वाहतूक खर्च कमी बसतो. तर अन्य बंदरात छोट्या आकाराच्या बोटी लागत असल्याने खर्च वाढतो. या शिवाय मुंबई बंदरात जहाजातून केवळ धान्य खाली उतरवण्यास ८० ते ९० रुपये मे. टनाला खर्च येतो. गोडाऊन चार्जेस ६० रुपये प्रति टन खर्च येतो. तेथून पोत्यात भरून ट्रकने पाठवण्याचा खर्च वेगळा. छोट्या बंदरात मोठ्या बोटीतून २०० टनी छोट्या बोटीत भरून नंतर बंदरात नेऊन उतरवले जात असल्याने उतरवणीचा खर्च दोनदा होतो. शिवाय बोट वाहतुकीचा खर्चही वाढतो. वरील सर्व खर्च विचारात घेतले तरी आज बंदरातील गोदामात गहू पोहोचवण्यात मुंबईत १००० रुपये प्रति. मे. टन तर टुटीकोरीयन सारख्या बंदरात किमान १३०० रुपये प्रति मे. टन खर्च येत असावा. या खर्चात उतरवण्यासाठी झालेल्या विलंबामुळे वाढलेल्या खर्चाचा अर्थातच समावेश नाही.

आता विदेशातील धान्य खरेदीचे स्वरूप पाहू. इकनॉमिक टाइम्स (१० ऑक्टोबर ९२) मध्ये परदेशात भारताने केलेल्या गव्हाच्या खरेदीची माहिती दिली आहे. तेथील खरेदीचे दर पुढील प्रमाणे आहेत.

**आयात गव्हाच्या किंमती**

| देश | किंमत प्रतिटन अम. डॉलर | किंमत प्रति क्विंटल भारतीय रुपयात |
|---|---|---|
| अमेरिका | ११०.५० | ३३१.५० |
| | ११२.५० | ३३७.५० |
| ऑस्ट्रेलिया | १३७.५० | ४१२.५० |
| | १३५.०० | ४०५.०० |
| कॅनडा | १४७.५० | ४४२.५० |

वरील माहिती प्रमाणे ऑस्ट्रेलिया व कॅनडा येथील गव्हाला एक अमेरिकन डॉलरची किंमत ३० रुपये धरल्यास ४०५ ते ४४२.५० प्रति क्विंटल दराने भारताने खरेदी केली. मात्र अमेरिकेचा गहू थोडा स्वस्त मिळाला. याचे कारण आपला गहू भारताने खरेदी करावा म्हणून अमेरिकन शासनाने प्रति टन ३०.४५ डॉलर इतके निर्यात अनुदान दिले आहे. म्हणजे अमेरिकन शेतकऱ्याला अनुदानासह मिळालेली किंमत प्रति क्विंटल ४३१.८५ रुपये ते ४३७.८५ रुपये पर्यंत मिळाली आहे. याचा अर्थ विदेशातील शेतकऱ्यांना त्यांच्या गव्हाला मिळालेली सर्वसाधारण किंमत प्रति क्विंटल ४२५ रुपये इतकी आहे. इतकेच नव्हे तर आपला गहू विकला जावा म्हणून अमेरिकेन प्रति क्विंटल १००.३५ रुपये अनुदानही देऊ केले आहे. म्हणजे तेथील शासनाला शेतकऱ्यांना किमान ४२५ रुपये प्रति क्विंटल मिळणे रास्त आहे असे वाटते.

या उलट भारतातील परिस्थिती पहा. कृषि उत्पादन खर्च आणि मूल्य आयोगाने गव्हाला प्रतिक्विंटल ३०५ रुपये द्यावे असे सुचवले. तरीही केंद्र शासनाने आधारभूत किंमत प्रति क्विंटल २५० रुपयेच निश्चित केली. पण शेतकरी गहू देणार नाहीत म्हणून नाइलाजाने प्रति क्विंटल २५ रुपये केंद्र शासनाने कांही राज्य शासनांनी प्रति क्विंटल ५ रु. जादा बोनस देऊ केला. अशी एकूण ओढून ताणून प्रति क्विंटल २८० रुपये पंजाब, हरियानातील भारतीय शेतकऱ्यांला मिळाले. खाजगी व्यापाऱ्यांना बाजारपेठांतून पोलिसांनी धमक्या देऊन हुसकावून लावले. जर खरेदीला आला तर तुमचे अतिरेक्यांशी संबंध आहे असे समजून करवाई करू, असे सांगून त्यांना खरेदीपासून परावृत्त केले. यामुळे अडलेल्या गरजू शेतकऱ्यांनी रोख रकमेसाठी ६५ लाख टनापर्यंत गहू शासनाला विकला.

जोर जबरदस्ती करण्याऐवजी केंद्र शासनाने प्रतिक्विंटल ३५० रुपये इतका दर दिला असता तरी पुरेशी खरेदी ऐच्छिकच झाली असती. पण तसे न करता जोर जबरदस्तीचा मार्ग शासनाने स्वीकारला. हे अपुरे पडले म्हणून त्वरीत विदेशातून इथल्या किंमतीपेक्षा दुप्पट दर देऊन गव्हाची आयात करण्याचा निर्णय घेऊन आयात सुरू केली. प्रति क्विंटल ३५० रुपये दर दिला असता तर १ कोटी टन गहू खरेदीसाठी फक्त ७०० कोटी रुपये भारतीय चलनामध्ये जादा खर्च करावे लागले असते. पण ते न करता १५०० कोटी रुपये विदेशी चलनामध्ये खर्च करून ३० लाख टन गहू आयात करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

जर केंद्र शासनाने १ कोटी टन धान्य खरेदी प्रति क्विंटल ३५० रुपये दराने केली असती तर ३५०० कोटी रुपये लागले असते. आज जोर जबरदस्ती करून ६५ लाख टन गहू प्रति क्विंटलला २८० रुपयांने खरेदी केला आहे. उरलेला गहू प्रति क्विंटल ५२० पेक्षा जादाखर्च करून आयात केला. तरीही १ कोटी टन धान्य खरेदीचा शासकीय खर्च ३५०० कोटी रुपयाच्या जवळपासच जातो. म्हणजे गहू खरेदीचा आज जो खर्च केला तेवढाच खर्च करून ३५० रुपये दर देता आला असता. पण ते न करता भारतीय शेतकऱ्यांना धडा शिकवण्यासाठी गव्हाची आयात केली, त्यासाठी १५०० कोटी रुपयाचे परकीय चलन खर्च करण्याची हिंमत शासनाने आजच्या अत्यंत अडचणीच्या परिस्थितीत केली. तरीही केंद्राच्या या धोरणाचे समर्थन करणे कितपत योग्य आहे? हेच ७०० कोटी रुपये जर भारतीय शेतकऱ्याला मिळाले असते तर गहूशेतीचा पाया अधिक भक्कम झाला असता. उत्पादनवाढीला उत्तेजन मिळाले असते. पुढील वर्षी अधिक गहू उत्पादन करून कदाचित देशाला परकीय चलनही मिळाले असते. तसेच गहू उत्पादनापासून विक्रीपर्यंत सर्व पैसा भारतीय लोकाच्याकडेच जाऊन लोकांची क्रयशक्तीही वाढली असती. पण असे घडले नाही.

आज पंजाबमधील परिस्थिती थोडीशी सुधारली आहे. पण केंद्र शासनाच्या अशा धोरणामुळे पुन्हा एकदा पंजाबमधील शेतकऱ्यांची मुले अतिरेकी चळवळीकडेच शोषणमुक्तीचा आधार म्हणून पाहू लागली तर त्यांना दोष कसा देता येईल? वरकरणी पंजाबचा प्रश्न धार्मिक वाटत असला तरी त्याच्या आर्थिक स्वरूपाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यापूर्वीही अतिरेकी चळवळींची वाढ प्रामुख्याने अशा परिस्थितीत झाली आहे. या पूर्वी १९८४ मध्ये पंजाबच्या १ लाख शीख शेतकऱ्यांनी शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली राज भवनाला घेराव घातला त्यावेळी त्यांची मागणी एवढीच होती की पंजाबमधील कृषि विद्यापीठाने काढलेल्या गव्हाच्या उत्पादनखर्चाएवढी म्हणजे प्रति क्विंटल २०० रुपये इतकी किंमत मिळावी हे कराल तर आम्ही अतिरेक्यांना गावातच संपवू, असे आवाहन पंजाबमधील शेतकरी संघटनेने केले होते. पण तसे घडले नाही. भारतीय शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १४० रुपये भाव मिळाला. त्याचवेळी अमेरिकेतून प्रति क्विंटल २५० रुपये दरांनी गव्हाची आयात झाली. सनदशीर मार्गानी न्याय मिळाला नाही. नंतर ऑपरेशन ब्लू स्टार झाले. पंजाबमधील शेतकरी चळवळीकडे असलेला तरूण वर्ग अतिरेक्यांच्याकडे वळला. जर्नेलसिंग भिंद्रनवाले यांनी शेतकऱ्यांना पाठींबा देण्याची इच्छा व्यक्त केली. पण राजभवनासमोर जमलेल्या १ लाख शीख शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला कारण भिंद्रनवाले जातीयवादी आहेत म्हणून. त्यांनी शरद जोशी यांचेच नेतृत्व स्वीकारले. पण तेच तरूण आता भिंद्रनवाले पंथात सामील झाले तर त्यांची काय चूक आहे ? आजही अतिरेकी संघटना शेतकऱ्याची सहानूभूती मिळवण्याचा प्रयत्न करीत आहेत. कृषि उत्पादन खर्च व मूख्य आयोगाच्या अध्यक्षांची झालेली हत्या, हा त्याचाच एक भाग असावा. कारण या आयोगाच्या कार्यपद्धतीविषयी शेतकरीवर्गात मोठा असंतोष आहेच. अशा परिस्थितीत सध्याची गव्हाची आयात म्हणजे अतिरेक्यांना मिळालेले जीवनदानच होय.

आता भारतातील गव्हाच्या किंमती खरोखरच वाजवीपेक्षा जास्त आहेत का हे पाहू. भारतात ३८० ते ४२५ रुपयापार्यंत गव्हाचे भाव आहेत. गहू पिकवणाऱ्या विदेशी देशात ४२५ रुपये इतका भाव आहे. शेतकऱ्यांना हा दर मिळावा व गव्हाची निर्यात व्हावी म्हणून तेथील शासन निर्यात अनुदानही देणेस तयार आहेत. भारतात मात्र शासनाची शेतकऱ्यांनी २५० रुपयाला गहू विकावा अशी अपेक्षा आहे. नाइलाज म्हणून

३० रुपये वाढवून दिले. खरोखरच भारतातील गव्हाचा उत्पादनखर्च इतका कमी आहे काय?

अमेरिकेत किमान जमीनधारणेचा कायदा नाही. हजारो एकज जमीन एका शेतकरी कुटुंबाच्या मालकीची, बहुदा मजूर न घेता सर्व यांत्रिक साधनानी, तणनाशके, कीटकनाशके, रासायनिक खते वापरून शेती केली जाते. कापणी व मळणीही यंत्रांनी होते. सर्व शेती अवजारे, औषधे, बियाणे उत्तम दर्जाची कमी भावात त्यांना मिळतात. तेथे फक्त मजुरीचा भाव खूप जास्त आहे. पण तेथील शेतीत बाहेरील मजूराची फारशी गरज लागतच नाहीच. या उलट भारतातील शेती. कालबाह्य किमान जमीन धारणा कायदा, वारसा हक्काने झालेली, तसेच इतर अनेक कायद्यामुळे जमिनींचे लहान तुकडे, भांडवलाचा अभाव बहुतेक शेती अवजारे दुसऱ्या, तिसऱ्या दर्जाची, रासायनिक खतांची भरमसाठ किंमत, कीटकनाशकांच्याही किंमती अमेरिकेपेक्षा जास्त. फक्त मजूर स्वस्त. तरीही इथल्या गव्हाला अमेरिकेतील गव्हाइतकासुद्धा दर मिळू शकत नाही. केवढे हे दुर्दैव! मग भारतीय शेतकऱ्यांनी अधिक धान्य पिकवावे, देशाला अन्न पुरवावे इतकेच नव्हे तर निर्यात करून परकीय चलन मिळवावे, अशी अपेक्षा ठेवणे तर दूरच.

भारतीय शेतकऱ्यांची भूमिका सरळ साधी आहे. खतांचे अनुदान कमी केले, त्याला विरोध नाही. विजेचे दर वाढणार. त्यालाही विरोध नाही. पण उद्योगालाही आंतरराष्ट्रीय स्पर्धा व भाव स्वीकारू द्या. आम्हालाही स्पर्धेला उभे करा. डाळी व तेलबिया आम्ही देशाला पुरे इतके कमी किंमतीत पिकवू शकत नाही. तर त्याचीही जरूर आयात करा. त्याला आमचा विरोध नाही. विरोध आहे गव्हाच्या आयातीला. कमी किंमतीत देशात भरपूर पिकत असताना आयात केली जाते व तेही भरमसाठ किंमत देऊन. याला आमचा विरोध आहे. गव्हाचे, कापसाचे, साखरेचे निर्यातदार देश होण्याची ऐपत असताना आयात केली जाते. याबद्दल आम्हाला खंत आहे.

गव्हाच्या आयातीला विरोध करण्याची विरोधी पक्षांची भूमिका बरोबर आहे. पण विरोधी पक्षांच्या एकंदर धोरणात सुसंगती नाही हा आरोप बरोबर आहे. भा. ज. प. व जनता दलाने महागाई कमी केली नाही. म्हणून मोर्चे काढायचे. त्याचवेळी गव्हाचे दर वाढवा म्हणून आंदोलनही करायचे. यात उघडच विसंगती आहे. सर्वच पक्षांनी देशातील ग्राहकांना प्रति क्विंटल ४५० पर्यंत गव्हाच्या किंमती झाल्या तरी त्या रास्त आहेत, हे स्पष्ट सांगण्याची गरज आहे.

माजी पंतप्रधान विश्वनाथप्रताप सिंग यांनी गव्हाची आयात डंकेल प्रस्ताव मान्य केल्याने झाली, असा आरोप केला आहे. जनता दलाचे अध्यक्ष एस. आर. बोमाई यांनीही असाच आरोप केला आहे. माजी अर्थमंत्री श्री. मधू दंडवते यांनी डंकेल प्रस्तावातील गुप्त अटीतून आयात झाल्याचा आरोप केला आहे. वास्तविक हे सर्व आरोप निराधार आहेत. डंकेल प्रस्ताव हा जागतिक व्यापारात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न आहे. अनेक प्रगत देशांनी त्या देशातील शेती-व्यवसायाला प्रचंड अनुदान देऊन शेती-व्यवसायाचा अनैसर्गिक विकास घडवून आणला आहे. त्यामुळे शेती व अन्य कांही उद्योगात अनुदान व सवलत यांचे युद्धच सुरू आहे. सर्वांनीच क्रमाक्रमाने हे थांबवावे. सर्व अनुदाने कमी करावीत. कार्यक्षमतेच्या आधाराने जागतिक उद्योग, व्यापार, शेतीची नवी मांडणी करण्याचा प्रयत्न डंकेल प्रस्तावाद्वारे करण्यात येत आहे. यामुळे खास करून शेतीमालाच्या व्यापारातील प्रगत राष्ट्रांच्या आर्थिक दंडेलशाहीला आळा बसणार आहे. म्हणूनच, युरोप, फ्रान्स येथील शेतकऱ्यांचा या प्रस्तावाला तीव्र विरोध आहे. मात्र डंकेल प्रस्तावामुळे भारतीय शेतीला जगाची मोठी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. डंकेल प्रस्तावामुळे कमी उत्पादनखर्च असलेले देश इतर देशात निर्यात करू शकतील. डंकेल प्रस्तावामुळे भारतातून अमेरिकेलाच गव्हाची निर्यात होईल. पण तेथून गहू भारतात येणार नाही. उत्तम प्रत व कमी किंमत असलेला माल आधी विकला जाईल व खुल्या व्यापाराच्या तत्त्वाने भारतीय शेतीची भरभराट होईल.

गव्हाची आयात करण्याचा निर्णय पंडीत नेहरूंच्या तथाकथित समाजवादी धोरणांचा वारसा आहे. एका बाजूला संरक्षणाच्या भिंती उभ्या करून कारखानदारीला संरक्षण दिले. दुसऱ्या बाजूला लेव्ही, राज्यबंदी, जिल्हाबंदी, निर्यातबंदी, परदेशातून प्रसंगी भरमसाठी किंमत देऊन, प्रसंगी भीक मागून आयात करून देशातील शेतीमालाचे दर पाडणे, हा पंडीत नेहरूंच्या धोरणांचा वारसा आहे. यामुळे, हलक्या प्रतीच्या मालाचे उत्पादन करणाऱ्या गलथान कारखानदारीला लायसन्स-परमिटमुळे संरक्षण मिळाले. पण जनतेला लुबाडणाऱ्या नोकरशहांची भरमसाठ वाढ झाली. उत्पादन-क्षमतेचे सर्व अंकूर खुडून खाणे एवढेच काम शासकीय यंत्रणा करू लागली. यामुळेच देश आज दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा राहिला आहे. सर्वच विरोधी पक्षांनी राजकीय स्वार्थासाठी नवे आर्थिक धोरण व डंकेल प्रस्ताव यांच्या पिटाईत वेळ न घालवता प्रथम आपल्या धोरणात सुसंगती आणावी.

गव्हाची आयात केवळ प्रशासकीय चूक नव्हे तर देशद्रोहच आहे. देशाच्या पेढीवर बसलेले दिवाणजी सर्जनशील हिशोबपद्धतीचा वापर करून आयात योग्य आहे असेच म्हणतील. अनेक पत्रपंडीत आणि विद्वान त्यांचे समर्थन करू लागतील. पण देशाचा कारभार याच पद्धतीने चालला तर आर्थिक अरिष्ट आणि देशाचे विघटन अटळ ठरेल. म्हणून या दिवाणजींवर विसंबून न राहाता देशाच्या खऱ्या मालकांनी त्यांना जाब विचारला पाहिजे. गव्हाच्या आयातीला विरोध ही एक अशीच संधी आहे. नेहरूवादी विचारांचे जोखड फेकून देऊन देशातील तमाम जनतेला मुक्त करण्याची. सर्वच सूज्ञ व्यक्तींनी यात सहभागी झाले पाहिजे.

### झेंडा लुटला गेला

फुटक्या पाटीवर
गणकयंत्राचा परिचय लिहितांना,
फाटक्या इतिहासात
नेहरूंचे वैभव वाचतांना,
पोटात भुकेचा डोंब उठला
अन् गांधीबाबाचा
ग्रामस्वराज्याचा झेंडा
फडकण्याआधीच लुटला गेला

**— बभ्रुवाहन रक्षाळे**
वाकली, जि. लातूर

# नेहरूनीती दहन – १४ नोव्हेंबर १९९२

हेरले जि. कोल्हापूर येथे शेतकरी महिला आघाडीच्या गावप्रमुख सौ. आक्काताई अदगोंडा पाटील (पुतळ्याच्या डाव्या बाजूकडील) यांनी नेहरूनीतीच्या पुतळ्यास अग्नी दिला.

१९ नोव्हेंबर १९९२ रोजी महाराष्ट्रातील गावागावात, शेतकऱ्यांच्या मानेवर सुरी फिरविणाऱ्या नेहरूनीतीच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. पुढील गावात हा कार्यक्रम झाल्याची नोंद शेतकरी संघटकच्या कार्यालयाकडे आली आहे.

**वर्धा :** समुद्रपूर, वायगाव, रेणुकापूर, वाघेडा, सावरखेड, किन्हाळा, बिकनी, घोडेगाव, भोसा, वायगाव (बैलमारे), हिरडी, शेगाव (कुंड), येणोरा, किन्हाळा, आजंती, चिकमोह, उमरी, शेकापूर, जागीना, खापरी, पिंपरी, सिरसगाव, वाघोली किनगाव, कुरझडी (फोर्ट), खातखेडा, एकांबा, आगरगाव, सोनेगाव, इंझाळा, दहेगाव, पिंपळगाव, सिंदी, घोराड, सेलडोह, पळसगाव, दिग्रस, दहेगाव (मुस्तफा), धनोडी, खरांगना, काचनूर, दहेगाव (गोंडी), काजखेडा, वायगाव (वि.), कुरझडी, चितोडा, परसोडा, सोनेगाव (आबाजी)

**अमरावती :**
काटी, काटसूर, कापूसतळणी

**अकोला :**
चंडिकापूर

**चंद्रपूर :**
चौगान, जुगनाळा, रानबोथली, कसर्ला

**यवतमाळ :**
झोंबाडी, पिंपळगाव (डुबा), कोलुर, मांगलादेवी, आसोला, खडकी

**नागपूर :**
पिंपळगाव

**परभणी :**
सावळी, कनेरगाव, आसोला, पुरजळ, शिरला, तपोवन, गुंडा, करंजी, मारवाडी, हट्टा

**लातूर :**
उजळंब, लोहारा

**बुलढाणा :**
वाकी बु.

**कोल्हापूर :**
हेर्ले, कापशी

**नांदेड :**
जोशी-सांगवी, संगुची वाडी, कोंढा, कामठा, देळूब (खु), शेलगाव

**नाशिक :**
धामणगाव, सायगाव, अंगुलगाव, अंदरसुल, सत्यगाव, एरंडगाव, धुळगाव, सातारे, चांदवड.

## भारतीय शेतकऱ्यांनी घाम गाळण्यात कुचराई केली नाही

# देशातील अन्नधान्यांचे उत्पादन

(सर्व आकडे दशलक्ष टनांमध्ये)

| पीक | | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ | १९८८-८९ | १९८९-९० | १९९०-९१ | १९९१-९२ | | १९९२-९३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | उद्दिष्ट | ऑगस्ट ९२ मधील माहितीप्रमाणे | उद्दिष्ट |
| तांदूळ | खरीप | ५९.४० | ५३.५६ | ४९.०५ | ६३.३८ | ६५.८८ | ६६.५८ | ६८.५० | ६६.१ | ६८.७५ |
| | रब्बी | ४.४३ | ७.०० | ७.८१ | ७.११ | ७.६९ | ८.०१ | ८.०० | ८.४ | ८.५० |
| | एकूण | ६३.८३ | ६०.५६ | ५६.८६ | ७०.४९ | ७३.५७ | ७४.५९ | ७६.५० | ७४.५ | ७७.२५ |
| गहू | | ४७.०५ | ४४.३२ | ४६.१७ | ५४.११ | ४९.८५ | ५४.५२ | ५६.५० | ५५.२ | ५७.०० |
| ज्वारी | खरीप | ७.२७ | ६.४७ | ८.५६ | ७.०६ | ९.२३ | ८.३८ | ८.८७ | ५.९ | ९.०० |
| | रब्बी | २.९३ | २.७२ | ३.६४ | ३.११ | ३.६७ | ३.५० | ३.८३ | २.५ | ४.०० |
| | एकूण | १०.२० | ९.१९ | १२.२० | १०.१७ | १२.९० | ११.८८ | १२.७० | ८.४ | १३.०० |
| भरड धान्ये | खरीप | २१.३१ | २२.४४ | २१.१५ | २६.६४ | २९.६० | २७.९२ | २८.५५ | २३.० | २८.५० |
| (ज्वारी,बाजरी | रब्बी | ४.८९ | ४.३९ | ५.२१ | ४.८३ | ५.१६ | ५.१४ | ५.४५ | ४.१ | ५.७५ |
| बार्ली, वगैरे) | एकूण | २६.२० | २६.८३ | २६.३६ | ३१.४७ | ३४.७६ | ३३.०६ | ३४.०० | २७.१ | ३४.२५ |
| सर्व धान्ये | खरीप | ८०.७१ | ७६.०० | ७०.२० | ९०.०२ | ९५.४८ | ९४.५० | ९७.०५ | ८९.१ | ९७.२५ |
| | रब्बी | ५६.३७ | ५५.७१ | ५९.१९ | ६६.०५ | ६२.७० | ६७.६७ | ६९.९५ | ६७.७ | ७१.२५ |
| | एकूण | १३७.०८ | ३१.७१ | १२९.३९ | १५६.०७ | १५८.१८ | १६२.१७ | १६७.०० | १५६.८ | १६८.५० |
| कडधान्ये | खरीप | ४.५४ | ४.२० | ४.३६ | ५.६२ | ५.५१ | ५.४३ | ६.१० | ४.५ | ६.०० |
| | रब्बी | ८.८२ | ७.५१ | ६.६० | ८.२३ | ७.३५ | ८.६३ | ९.४० | ७.९ | ८.५० |
| | एकूण | १३.३६ | ११.७१ | १०.९६ | १३.८५ | १२.८६ | १४.०६ | १५.५० | १२.४ | १४.५० |
| एकूण अन्नधान्ये | खरीप | ८५.२५ | ८०.२० | ७४.५६ | ९५.६४ | १००.९९ | ९९.९३ | १०३.१५ | ९३.६ | १०३.२५ |
| | रब्बी | ६५.१९ | ६३.२२ | ६५.७९ | ७४.२८ | ७०.०५ | ७६.३० | ७९.३५ | ७५.६ | ७९.७५ |
| | एकूण | १५०.४४ | १४८.४२ | १४०.३५ | १६९.९२ | ७१.०४ | १७६.२३ | १८२.५० | १६९.२ | १८३.०० |
| तेलबिया | खरीप | ५९.५ | ६३.८ | ६४.२ | १०५.३ | ९६.२ | ९७.३ | १०१.० | ८९.० | १००.०० |
| | रब्बी | ४८.८ | ४८.९ | ६२.३ | ७५.० | ७३.० | ८७.३ | ८४.०० | ९४.१ | ९०.०० |
| | एकूण | १०८.३ | ११२.७ | १२६.५ | १८०.३ | १६९.२ | १८४.६ | १८५.०० | १९३.१ | १९०.०० |
| कापूस | | ८७.३ | ६९.१ | ६३.८ | ८७.४ | ११४.२ | ९७.६ | १२०.० | ९६.४ | १२०.० |
| ज्यूट व मेस्टा | | १२५.६ | ८६.२ | ६७.८ | ७८.६ | ८२.९ | ९१.० | ९१.० | १०१.३ | ९२.० |
| ऊस | | १७०८.५ | १८८०.९ | १९६७.४ | २०३०.४ | २२५५.७ | २४०२.९ | २३००.० | २५०२.८ | २४३०.० |

(इकॉनॉमिक टाईम्स्, १८ नोव्हेंबर १९९२ वरून)

# गहू-युद्धाचा इंडियन वृत्तांत

इकॉनॉमिक टाईम्स्च्या दि. २१ नोव्हेंबर १९९२ च्या अंकात मुंबईचे श्री. डी. पी. ठाकर यांनी 'Wheat Production : Irony of bumper crop and import' या शीर्षकाचा लेख लिहून इंडिया शासन आणि भारतीय शेतकरी यांच्यामध्ये इंडियाने सुरू ठेवलेल्या युद्धातील 'गहू' आघाडीवरील सविस्तर वृत्तांत दिलेला.

सरकारने देऊ केलेली गव्हाची किंमत शेतकऱ्यांना मान्य नसल्याने शेतकऱ्यांनी सरकारी यंत्रणेला गहू विकला नाही. त्यामुळे, सरकारच्या केंद्रीय साठ्यामधील आवक अत्यंत कमी होऊन तो रोडावू लागला. शेतकऱ्यांनी सरकारी खरेदी यंत्रणेला गहू विकावा यासाठी इंडिया शासनाने जे मार्ग अवलंबले त्याचे वर्णन करतांना लेखक म्हणतात,

"गव्हाच्या खरेदी किंमतीत केलेल्या घवघवीत वाढीव्यतिरिक्त शासनाने खरेदी जास्तीत जास्त व्हावी यासाठी आणखीही काही पावले उचलली. व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर गहू खरेदी करण्यापासून परावृत्त व्हावे यासाठी पंजाब व हरियाणातून रेल्वे वॅगन्स्‌ने गहू वाहतुक करण्यावर बंधने घातली. व्यापाऱ्यांना दर दिवशी २५० क्विंटलपेक्षा जास्त गहू खरेदी करण्याची परवानगी नाकारली. तसेच, २५० क्विंटल पेक्षा जास्त गहू साठवून ठेवण्याची व्यापाऱ्यांना बंदी केली. बँकांनी दलाल व मध्यस्थांच्या पतपुरवठ्याच्या बाबतीत नाड्या आवळल्या."

लेखक महाशय पुढे म्हणतात,

"शासनाचे हे सर्व पवित्रे फोल ठरले. शेतकऱ्यांनी गहू बाजारात आणलाच नाही. त्यांचा अधिक भावाचा आग्रह कायम राहिला. अनेक संघटनांनी, अगदी उग्रवादी संघटनांनीसुद्धा शेतकऱ्यांना पाठिंबा दिला. पण तरीही शासनाने त्याची कदर केली नाही. शेतकऱ्यांनी माल रोखून धरला. अत्यंत गरजू व लहान शेतकऱ्यांनीसुद्धा त्यांच्या तात्कालिक गरजेला पुरेल इतक्याच किरकोळ प्रमाणात गहू विकला. व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना पैसे देऊन त्यांच्या वतीने गहू आपल्या घरीच ठेवण्यामध्ये सहकार्य केले. व्यापाऱ्यांनी बयाणा म्हणून काही रक्कम शेतकऱ्यांना दिली आणि गहू शेतकऱ्याघरीच राहिला. शेतकऱ्यांनासुद्धा ही व्यवस्था सोयीस्कर वाटली."

युद्धवार्ताच असल्याने आणि सबलांच्या पक्षाच्या वतीने लिहिल्याने, अर्थातच, अतिशयोक्ती असणारच. लेखक लिहितात, "शेतकऱ्यांनी गहू रोखल्याने गव्हाच्या खुल्या बाजारातील किंमती आकाशाला भिडल्या." शेतकऱ्यांच्या किंमती अजून जमिनीतून वर येऊ देत नाहीत आणि यांच्या मात्र किंमती आकाशाला भिडतात!

मग अर्थातच्, लेखात आयातीचे भरभरून समर्थन, आयात गहू किनाऱ्यावर येतात किंमतीतील घसरण याबद्दलचा 'जितं मया'च्या अविर्भावात हर्षोल्लास याची रेलचेल आहे.

"पुढच्या वर्षी अशी काही वेळ येणार नाही, कारण शासनाने यंदा हा जो काही टोला दिलेला आहे त्याने शेतकरी आणि व्यापारी यांना असा धडा शिकविला आहे की ते भविष्यात असे धारिष्ट्य पुन्हा करणार नाहीत" अशी टिप्पणीही लेखात केली आहे.

लेखाचा शेवट करताना लेखक म्हणतात, "गव्हाच्या आयातीने तात्पुरता का होईना एका बनावट संकटापासून देश वाचला आहे. सद्यःस्थितीत गव्हाच्या आयातीला पर्याय नाही. पण ही परिस्थिती निर्माण करणाऱ्या घटकांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी शासनाला टाळता येणार नाही. खुल्या बाजारात शासकीय खरेदीकिंमतीच्या दुप्पट किंमती असतांना शेतकऱ्यांनी गहू विकला नाही म्हणून त्यांना दोष देण्यात अर्थ नाही. शासनाने पुरेशी उत्पादनवाढ होईल अशी कारवाई केली पाहिजे."

म्हणजे, उत्पादन वाढवा आणि किंमती पाडा! शेतकऱ्यांना किंमत मिळू द्या म्हणायला तयार नाहीत. आता अशा तऱ्हेने आपल्याच पायावर धोंडा पाडून घ्यायला शेतकरी तयार होतील अशी भोळसट कल्पना अजून 'इंडियनां'च्या मनात आहे?

### हिमाचल प्रदेशातील आदिवासींकडून शिकण्यासारखे
### अधिक उत्पन्न देणारेच पीक घेतात.

हिमाचल प्रदेशातील आदिवासी भागात बियाण्याचे बटाटे, वाटाणा व हॉप्स (बिहारच्या उत्पादनात उपयुक्त वनस्पती) अशी नगदी पिके होतात. सध्या हिमाचल प्रदेशातील इशौल व स्पीती या आदिवासी जिल्ह्यांतील शेतकरी कमी श्रमात अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या हॉप्स्‌चीच लागवड जास्तीत जास्त करू लागले आहेत. इतकेच नव्हे तर, त्यांना लागणारा तांदूळ व कडधान्येसुद्धा पिकविण्याच्या फंदात ते पडत नाहीत. ते नगदी पिकांचे उत्पादन करून त्या पासून मिळालेल्या पैशातून जीवनावश्यक तांदूळ व डाळी खरेदी करतात. नगदी पिकातसुद्धा हॉप्स जास्त उत्पन्न देणारे पीक असल्याचे त्यांना समजू शकते.

### गव्हाचे उत्पादन व सरकारी खरेदीकिंमत

| वर्ष | उत्पादन दशलक्ष टन | किंमत रुपये प्रति क्विंटल |
|---|---|---|
| १९५०-५१ | ६.५ | – |
| १९८५-८६ | ४७.१ | १५७ |
| १९८६-८७ | ४४.३ | १६२ |
| १९८७-८८ | ४६.२ | १६६ |
| १९८८-८९ | ५४.१ | १७३ |
| १९८९-९० | ४९.८ | १८३ |
| १९९०-९१ | ५४.३ | २१५ |
| १९९१-९२ | ५५.२ | २२५ |
| १९९२-९३ | – | २५० |

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th, December 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
December 6, 1992

**To**

**PNCW 281**
Licence
to post
without
prepayment
**No. 87**

# बंदर न्हेरू गद्दार गेहूँ रोकेंगे

शेतकरी संघटना

## ९ डिसेंबर १९९२ पासून
## १२ डिसेंबर १९९२ पर्यंत
## स्थळ : गेटवे ऑफ इंडिया, मुंबई

हा अंक तयार होत असताना महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागातून शेतकरी भावाबहिणींची मुंबईला जाण्याची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती मिळत आहे. हा अंक हातात पडेल त्यावेळी आपण जर अजून मुंबईला निघालेला नसाल तर लगेच अंथरुण-पांघरूण, शिधा-शिदोरी बांधून धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र मुंबई बंदराकडे चला. लढाईतला हा महत्त्वाचा टप्पा आहे.

**पाक्षिक शेतकरी संघटक**
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.